# रत्नाध्याय

बबनराव पाटील

**केवळ घरातील प्रभागांच्या दिशा निश्चित करण्यापेक्षा घरातील पंचतत्त्वांचे, ऊर्जेचे संतुलन कसे साधले जाईल ते पाहणेच श्रेयस्कर आहे. पंचतत्त्वांच्या संतुलनानेयुक्त वास्तुशास्त्रानुसार घराचं स्वप्नं पाहणे तुम्हा-आम्हाला शक्य झाले आहे ते तंतोतंत वास्तशास्त्रानुसार घर बांधून नाही आणि विनाकारण घराची तोडफोड करूनही नाही. या रामबाण आणि खणखणीत नाण्याचं नाव आहे - रत्नस्थापना.**

असं म्हणतात की १००% वास्तुशास्त्रानुसार बांधलेले घर मिळणं हे दुर्मीळच. नव्हे ती कविकल्पना आहे, पण त्यास अधिकाधिक वास्तुशास्त्रानुसार बनवण्याकरिता १००% प्रयत्न करणे मात्र नक्कीच आपल्या हातात आहे. कसे? अगदी शास्त्रानुरूप घराची रचना करून? नाही. तसे करणे प्रत्येक वेळीच काय पण अनेकदा अशक्यच आहे. दक्षिणोत्तर रस्ता असलेल्या गावात काही घरांचे दरवाजे पूर्वेला तर काहींचे दरवाजे पश्चिमेला येतात व त्यानुसार अंतर्गत रचनाही बदलतेच. एखाद्या घराच्या ईशान्येला असणारी विहीर किंवा बोअरवेल दुसऱ्या घराच्या नैर्ऋत्येस येऊ शकते. बिल्डिंगमधील एखादा फ्लॅट वास्तुशास्त्रानुसार नियमबद्ध करता आला तरी त्याच फ्लोअरवरचे इतर फ्लॅट्स तसेच करता येणे शक्यच नाही. सगळ्यांनीच पूर्वोत्तर हलके, आग्नेयेचे किचन, ईशान्येचे देवघर, आणि नैर्ऋत्येचे बेडरुम याचा आग्रह धरला तर सर्वच बिल्डिंग्जचे प्लॅन्स भुईसपाट होतील.

तसं पाहिलं तर ‘मयमतम’मध्ये २०-२२ मजली इमारतींचा उल्लेख आढळतोच. कदाचित आपल्या पूर्वजांनादेखील या प्रश्नाची चुणचुण नक्कीच भासली असणार. आज तर अशी परिस्थिती आहे की डावलेले वास्तुशास्त्र आपण जागोजागी पाहतच आहोत.

त्याचमुळे केवळ घरातील प्रभागाच्या दिशा निश्चित करण्यापेक्षा घरातील पंचतत्त्वांचे, ऊर्जेचे संतुलन कसे साधले जाईल ते पाहणेच श्रेयस्कर आहे. म्हणूनच वास्तुशास्त्रानुसार घराचं स्वप्न पाहणे तुम्हा-आम्हाला शक्य झालं आहे ते तंतोतंत वास्तुशास्त्रानुसार घर बांधून नाही आणि विनाकारण घराची तोडफोड करूनही नाही. हा रामबाण आणि खणखणीत नाण्याचं नाव आहे - रत्नस्थापना.

रत्ने तुम्हा-आम्हाला सर्वांनाच ज्ञात आहेत. सध्या तर ज्योतिष, वैद्यक व इतर अनेक शास्त्रांनी यांची उपयुक्तता सिद्ध केली आहे. वास्तुशास्त्रात यांचा उल्लेख कसा हा प्रश्न तुम्हा-आम्हाला पडणे साहजिकच आहे. वास्तुशास्त्रानुसार दिशा आणि रत्नांचे गुणधर्म यांचा योग्य तो मेळ बसवल्यास रत्नस्थापनेमागील रहस्ये उलगडतील.

संपूर्ण विश्व हे पंचमहाभूतांपासून बनलेलं आहे. ‘पंचभूतात्मकमिदं सर्वम् ।’ पृथ्वी, आप (जल), तेज, वायू आणि आकाश ही ती पाच महाभूते. वास्तुमध्येदेखील पंचमहाभूतांचे संतुलन राहिल्यास ऊर्जा गुणोत्कर्ष साधता येतो. हे समजण्याकरिता प्रथम वास्तूतील ऊर्जाप्रवाह व महाभूतांचे प्रधानत्व जाणून घेऊ.

वास्तुशास्त्राची संकल्पना सूर्यदेवतेवर अवलंबून आहे. पृथ्वी सूर्याभोवती पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते. त्यामुळे आपल्याला सूर्य पृथ्वीच्या पूर्वेपासून पश्चिमेकडे भ्रमण करताना दिसतो. म्हणूनच सूर्याची प्राणिक ऊर्जा ही पूर्वेकडून पश्चिमेकडे वहन करते.


पृथ्वी ही स्वतःच्या अक्षास २१ १/२° कललेली आहे. त्यामुळे या प्राणिक ऊर्जेचे वहन ईशान्येपासून पुढे नैर्ऋत्येकडे होते. त्याचप्रमाणे उत्तरेपासून दक्षिणेकडे जैविक ऊर्जेचे वहन होते. त्यामुळेच उत्तर व पूर्व या ऊर्जेच्या उगम दिशा व ईशान्य कोपरा हा अत्याधिक ऊर्जेचा कोपरा ठरतो. तर या अगदी विरुद्ध दक्षिण व पश्चिम या ऊर्जेच्या अस्त दिशा व नैर्ऋत्य कोपरा हा अत्याधिक ऋण ऊर्जेचा कोपरा ठरतो. या ऊर्जाप्रवाहांना धरूनच पुढे वास्तूमध्ये तत्त्वप्राधान्यही निर्धारित केले आहे.

ईशान्य कोपऱ्यात ‘जलतत्त्वास’ स्थान देऊन धन ऊर्जेचे अत्याधिक वहन तसेच शोषणही वास्तूमध्ये धन ऊर्जा प्रवाहांना चालना देते.

आग्नेय कोपऱ्यात अग्नीस स्थान देऊन तेथे तेजतत्त्व स्थानापन्न केल्याने संपूर्ण उत्तर-ईशान्य-पूर्व-आग्नेय प्रभाग हा वास्तूचा ऊर्जाधिक्याचा भाग सिद्ध होतो.

नैर्ऋत्य प्रभागात जडत्व अपेक्षित आहे हे साहजिकच आहे. याकरिता तेथे जड अशा पृथ्वीतत्त्वास स्थानापन्न केले आहे. त्यायोगे ऋण ऊर्जा प्रवाहांनाही रोखले जाते.

चंचल वायुतत्त्वास वायव्येस स्थान देऊन ऊर्जेचे मंडलाकार संवहन साधले आहे.




आता अशा प्रकारे तत्त्वनिर्धारण झाल्यानंतर जर वास्तूमध्ये एखादा कोपरा कट अथवा वाढीव असेल अथवा उताराच्या दिशा विपरीत असतील, तत्त्वविरोधी रचना असेल (ईशान्येस जिना, पूर्वेस संडास, नैर्ऋत्येस विहीर, बोअरवेल, आग्नेयेस पाणी) तर तत्त्वहानी होते व ती भरून काढण्याकरिता असंख्य उपाययोजना सांगितल्या आहेत.

त्यातील बिनातोडफोड करण्याचा सर्वोत्तम उपाय म्हणे रत्नदीपयोजना अथवा रत्नाध्याय.

रत्नदीपस्थापना (रत्नाध्याय) हे घराचे एक सुरक्षाकवच आहे. क्षय, पोलिओ, धनुर्वात, कांजण्या, गोवर यांसारख्या आजारांकरिता ज्याप्रमाणे बीसीजी, पोलिओ, ट्रीपल कांजण्या, गोवरविरोधी लस दिली जाते, त्याचप्रमाणे घराचे व्याधिक्षमत्व वृद्धिंगत करण्याकरिता आपल्या ऋषीमुनींनी रत्नाध्यायरूपी सुरक्षाकवचाचा अवलंब करण्यास सुचविले आहे.

एखादी वास्तू उभारण्यापूर्वीच प्लॉटवर रत्नाध्यकरता येतो. परंतु प्रत्येक वेळी वास्तू शुभारंभापूर्वी प्लॉटचा रत्नाध्याय केला असलेच असे नाही तर मग अशा वेळी बांधलेल्या घरातील वास्तुदोषनिवारण करण्याकरिता उपायस्वरूपही बांधलेल्या घरामध्ये रत्नाध्याय केला जातो. लसीकरणाद्वारे शरीराची त्या व्याधीविरोधी रोगप्रतिकारशक्ती वाढवून सुरक्षाकवच प्रदान केले जाते. तर रत्नाध्यायद्वारे घराची दोषप्रतिकारशक्ती तर वाढतेच; परंतु दूषित वास्तूमध्ये उपायस्वरूपही याचा उपयोग होतो. म्हणजेच लसीकरणापेक्षासुद्धा एक पायरी पुढे असे दुहेरी काम रत्नाध्यायाद्वारे साधते.

रत्नाध्यायामध्ये विविध रत्ने घरातील विविध पादांमध्ये विधिवत पुरली जातात.

'धर्मसिंधू' ग्रंथामध्ये 'ग्रहप्रीत्यर्थ' म्हणजेच ग्रहांना संतुष्ट करण्याकरिता द्यावयाची दाने उल्लेखलेली आहे. अर्थातच यामध्ये वस्त्र, धान्य, धातू, प्राणी याबरोबरच रत्नांचाही उल्लेख आढळतो. रत्नेही निसर्गातच आढळतात. जमिनीमध्ये, खाणीमध्ये आढळतात मोती-शिंपल्यात जे जमिनीचे ते जमिनीला दान देणे रत्नाध्यायात अभिप्रेत आहे.

धर्मसिंधू-

१) माणिक्यगोधूमधेनु रक्तवस्त्रगुडहेमताम्ररक्तचंदन ............ रवेः प्रीत्यर्थ दानानि ।

२) वंशपात्रस्थतंडुलकर्पूर मौक्तिकश्वेतवस्त्रघृतपूर्णकुम्भ-वृषभाश्च चंद्रस्य ।

३) प्रवाळगोधूम......... सुवर्णरक्तवस्त्रताम्राणि भौमस्य ।

४) नीलवस्त्र ......... आरुत्मतदासीहस्तिदन्तपुष्पाणि बुधस्य ।

५) पुष्परागमणिहरिद्राशर्कराश्च ......... गुरोः ।

६) चित्रवस्त्रश्वेता श्वधेनुवज्रमणि ......... तण्डुलाः शुक्रस्य ।

७) इन्द्रनीलमाषतैल ......... महिषीलोहकृष्णधेनव शनेः ।

८) गोमेदाश्वनीलवस्त्र ......... लोहानि राहोः ।

९) वैडुर्य तैलतिलक ......... केतोः ।

ग्रहांचे बलाबलत्व व त्यानुरूप रत्नांची योजना करण्यामागे असलेला कार्यकारणभावही तेवढाच महत्त्वाचा आहे.

पूर्व ही संततीकारक दिशा आहे. येथे संततीला कारक असणाऱ्या शुक्राची हिऱ्याची किंवा स्फटिकाची स्थापना शुभफलदायी ठरते.

आग्नेय ही अग्नितत्त्वप्रधान उपदिशा आहे. अग्नितत्त्वप्रधान पोवळं पुरल्याने तेथील अग्नितत्त्वास ते पूरकच आहे.

जेथे कापणे बंधन आणणे अपेक्षित तेथे नीलमचा प्रयोग करतात. दक्षिणेस ऋण ऊर्जाप्रवाहांना छेदून त्यावर बंधन आणण्याकरिता नीलमची योजना रास्तच आहे.

जड पुष्कराजाची योजना नैर्ऋत्येच्या जड पृथ्वीतत्त्वास पूरक ठरल्याने तेथील जडत्व वाढविण्यास उपयुक्तच आहे.

वायूची चंचलता नियंत्रणात आणून ऊर्जेचे मंडलाकार संवहन साधण्याकरिता गोमेदची योजना वायव्येस केली आहे.

पश्चिमेला बुधाला पाचूची योजना केली आहे. उत्तर ही जलतत्त्वप्रधान दिशा येथील जलतत्त्वास तसेच येथील चंद्रप्रवाहांना चालना देण्याकरिता चंद्राच्याच मोतीची स्थापना उत्तरेस करणे फलदायी ठरते.

वास्तुपुरुषमंडळात शिवाची दिशा ईशान्य. वास्तुपुरुष याच शिवचरणांशी नतमस्तक झाला आहे. स्फटिकाची स्थापना या ईशान्येस केल्यास साक्षात शिवाचाच अंश येथे प्रदान केला जाईल.

संपूर्ण सूर्यमालेत सूर्य हा केंद्रस्थानी व पूर्ण ग्रहमाला त्याच्याभोवती भ्रमण करीत असल्याने सूर्याचे माणिक्य हे रत्न वास्तूच्या ब्रह्मस्थानात स्थानापन्न झाले आहे.

भूगर्भांतर्गत दोषांचा विचारही रत्नदीपस्थापने अंतर्गत केलेला आढळतो.

जसे भूमीचे दोष तसेच भूगर्भाचेही दोष. भूगर्भांतर्गत स्तरांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर उलाढाली झाल्यास भूगर्भीय तणाव ज्यास Gepathic Stress म्हणतात; तो निर्माण होतो. भूमिदोष, धन-ऋण ऊर्जाप्रवाह, आपण वापरत असलेली विद्युत उपकरणे यांचा मानवी जीवनावर शुभाशुभ परिणाम होतो. त्याचप्रमाणे जमिनीखालून वाहणाऱ्या घातक प्रवाहांचाही हानीकारक परिणाम आढळून येतो. या प्रवाहांना 'ब्लॅक स्ट्रीम' असे संबोधितात. यामध्ये पाण्याचे प्रवाह, तेलाचे प्रवाह व लाव्हारसाचा प्रवाह याची गणना होते. या तणावग्रस्त जमिनीच्या पृष्ठभागावर आपली बसण्याची किंवा प्रामुख्याने झोपण्याची जागा येत असेल तर आपलं आरोग्य नक्कीच धोक्यात येतं.

रत्नदीपस्थापनेद्वारे भूमिदोष, वास्तुरचनाविषयक दोषोपाय, ग्रहपुष्ट्यर्थदान तसेच भूगर्भांतर्गत दोष चिकित्सा असे तिहेरी सुरक्षाकवच वास्तूस लाभून ऊर्जेचे मंडलाकार संवहनाने पंचमहाभौतिक समतोल साधला जातो. आपसूचक अडचणी, संकटे यांचा पिच्छा सुटतो.

आता रत्नाध्यायाची कृती जाणून घेऊ 'मयमतम'च्या १२व्या अध्यायामध्ये व 'मानसार'च्या १८व्या अध्यायामध्ये रत्नाध्यायांचे विस्तृत वर्णन आढळते.

रत्नाध्यायामध्ये रत्नस्थापनेकरिता बीजमंत्रयुक्त स्वस्तिक यंत्राचे आसन वापरले जाते.

स्वस्तिक स्वतः वास्तुदोषनिवारक, धन ऊर्जायुक्त, त्यातच ते ॐ हं, सं, शं, षं बीजमंत्रांनीयुक्त. ही बीजमंत्रे जी अनेक वैदिक सुक्ते, ऋचांचा भाग आहेत. त्यांनी युक्त स्वस्तिकयंत्र. त्यामुळे ते अधिक प्रभावशाली, शक्तिशाली झाले आहे.

रत्नदीपस्थापनेतील रत्नांवरदेखील त्या त्या ग्रहांच्या विशिष्ट मंत्राचा १०८ वेळा जलाभिषेक केला जातो.

**ग्रहांचे बीजमंत्र**

| रत्न | बीजमंत्र |
|---|---|
| माणिक | ॐ ऱ्हां ऱ्हीं ऱ्हौं सः सूर्याय नमः। |
| मोती | ॐ श्रां श्रीं श्रौं सः सोमाय नमः। |
| पोवळे | ॐ क्रां क्रीं क्रौं सः भौमाय नमः। |
| पाचू | ॐ ब्रां ब्रीं ब्रौं सः बुधाय नमः। |
| पुष्कराज | ॐ ग्रां ग्रीं ग्रौं सः गुरवे नमः। |
| हिरा | ॐ द्रा द्रीं द्रौं सः शुक्राय नमः। |
| नीलम | ॐ प्रां प्रीं प्रौं सः शनैश्चराय नमः। |
| गोमेद | ॐ भ्रां भ्रीं भ्रौं सः राहवे नमः। |
| वैडुर्य | ॐ स्त्रां स्त्रीं स्त्रौं सः केतवे नमः। |
| स्फटिक | ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धि पुष्टिवर्धनम्।<br>ऊर्वारुकमिक बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मामृतान्॥ |

बीजमंत्रयुक्त स्वस्तिकयंत्राच्या आसनावर अभिमंत्रित रत्नांची प्राणप्रतिष्ठापना म्हणजे साक्षात ऊर्जादायी यंत्रणाच स्थानापन्न केल्यासारखी आहे.

शुभदिनी शुभमुहूर्तावर प्रथम गृहस्वामींकडून पुण्याहवाचन गणेशपूजन करवून जेथे रत्नस्थापना करायची आहे ते स्थान प्रथम शुद्ध करून घेतात. नंतर तेथे अक्षतांचे आसन करून त्यावर बीजमंत्रयुक्त स्वस्तिक ठेवून त्यावर जेथे ॐ लिहिले आहे त्या ठिकाणी अक्षता ठेवून त्यावर रत्नस्थापन करतात. या रत्नाची गृहस्वामीच्या हस्ते पंचोपचार पूजा करवून संकल्पपूर्वक पूजन करावे. नंतर सिमेंट; वगैरे वापरून लादी पूर्ववत बसवावी.

रत्नाध्याय केल्यानंतर वास्तूमध्ये पंचमहाभूतांचे संतुलन साधून ऊर्जागुणोत्कर्ष होतो.

'मयमतय' व 'मानसार' या ग्रंथांमध्ये रत्नध्यायातल्या दिशावर रत्नस्थापनेबाबत काही मतभेद आढळून येतात.


'मानसारम'च्या १८व्या अध्यायानुसार ब्रह्मस्थानी माणिक, पूर्वेला हिरा, अग्नियेला पोवळं, दक्षिणेला नीलम, नैर्ऋत्येस पुष्कराज, पश्चिमेला पाचू, वायव्येला गोमेद, उत्तरेला मोती तर ईशान्येला स्फटिक अशी स्थापना सांगितली आहे.

मानसारनुसार खालील क्रमाने योजना करतात.

मध्ये पदमरांग तु वज्रं चैवेन्द्रकोष्टके ।
विद्रुमं अग्निकोणे तु याम्ये नीलं तु विन्यसेत् ।।
नैऋत्ये पुष्परागं तु प्रत्यङमरकतं क्षिपेतु ।
गोगेदकं न्यसेद्वार्यो सौम्ये मौक्तिकं विन्यसेत् ।।
ईशे स्फटिकं निक्षिप्य तत्तद्देवान्स्वना मातः ।।

(मानसारम्)

**मानसारनुसार**




माणिक (Ruby)
स्फटिक (Crystal)
पोवळे (Red coral)
नीलम (Blue Sappline)
पुष्कराज (Yellow Sapphine)
हिरवा पाचू (Green Emerald)
गोमेद (Cinomen)
मोती (Pearl)

‘मयमतम’च्या १२व्या अध्यायात ब्रह्मस्थानी माणिक, पूर्वेला पोवळं, आग्नेयेला पुष्कराज, दक्षिणेला लसण्या, नैर्ऋत्येला हिरा, पश्चिमेला इन्द्रनील, वायव्येला महानील, उत्तरेला पाचू, ईशान्येला मोती अशी रचना सांगितली आहे.

‘मयमतम’नुसार खालीलप्रमाणे रत्नयोजना करतात.

मध्यमे पद्‌मरागं तु मरीचौ विद्रुमं मतम् ।
सविन्द्रे पुष्परागं तु वैडुर्यं स्याद् विवस्वति ।।
वज्रमिन्द्रजये विद्यादिन्द्रनीलं तु मित्रके ।
रुद्ररो महानीलं मरकतं तु महीधरे ।।
मुक्तापवत्से मध्यादि पूर्वेण क्रमशो न्यसेत् ।
(मयमतम्)

**मयमतमनुसार**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | 7 | | 8 | | 9 | | |
| | | | | | | | | |
| | | 6 | | 1 | | 2 | | |
| | | | | | | | | |
| | | 5 | | 4 | | 3 | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ब्रह्मस्थान | (१) | माणिक (Ruby) |
| मरीच | (२) | पोवळे (Red coral) |
| सवितृ | (३) | पुष्कराज (Yellow Sapphire) |
| विवस्वान् | (४) | वैडुर्य (Cat'seye) |
| इन्दजय | (५) | हिरा (Diamond) |
| मित्रक | (५) | नीलम (Blue Sapphire) |
| रुद्रजय | (७) | नीलम (Blue Sapphire) |
| पृथ्वीधर | (८) | हिरवा पाचू (Green Emerald) |
| आपवत्स | (९) | मोती (Pearl) |

निवासी वास्तूकरिता वरील क्रम लागू पडतो. परंतु मंदिररचनेकरिता रत्नन्यास हा वेगळ्या प्रकारे सांगितला आहे. मंदिररचनेत निवासी घराचा रत्नक्रम चुकूनही अमलात आणू नये. मोठी पंचाईत होईल.

इन्द्र प्रणवमित्युत्का देवेन्द्रे वज्रमुत्तमम् ।
अग्नावग्नेति चाग्नेय्यां मौक्तिकं प्रक्षिपेत्ततः ।।
यमोदाधादिना याम्ये वैडुर्य प्रक्षिपेद्‌गुरुः ।
वसवः प्रथमेत्युक्त्वा नैऋत्यं शंखजं क्षिपेत् ।
एते शतेति वारुण्यां कासीसमापि निक्षिपेत ।
मरुतः परमात्मेति वायव्ये पुष्यरागकम् ।।
सोमं राजानमित्युक्त्वा चंद्रकान्तं तू सौम्य के ।
ईशानोति च मन्त्रेण चैशान्य नीलभुक्षिपेत ।।
(समूर्तागम - रत्नन्यासविधी)

मंदिराकरिता पूर्वेस हिरा, आग्नेयेस मोती, दक्षिणेस लसण्या, नैर्ऋत्येय शंखज, पश्चिमेला कासीस, वायव्येला पुष्कराज, उत्तरेला चंद्रकांत, ईशान्येला नीलम अशा क्रमाने रत्नन्यास करावा.

निवासी वास्तू व मंदिर याकरिता कशा प्रकारे रत्नन्यास करावा हे आपण पाहिले. या दोन्ही प्रकारच्या वास्तूमध्ये रत्ननिवडीत गफलत करू नये.

वास्तुउपायांमध्ये सगळ्यात प्रभावी व चमत्कारिक परिणाम देणारा उपाय म्हणे रत्नाध्याय. डोळ्यावर विश्वास बसणार नाही इतकी आश्चर्यकारक फळे रत्नाध्याद्वारे मिळतात.

वैद्यकशास्त्र काय, ज्योतिषशास्त्र काय किंवा वास्तुशास्त्र काय; शास्त्र सर्वांकरिता एकच आहे. शास्त्रातील नियम, सूत्रे सिद्धान्तही ठरलेले आहेत. तसेच उपायही विविधरंगी, विविधढंगी असले तरी एकाच ध्येयाप्रत नेणारे असतात. खरी गरज असते ती अचूक निदानाची. दोष नेमका हुडकून काढून त्यावर अचूक उपाययोजना करण्यात वैद्य-ज्योतिषाप्रमाणेच वास्तुतज्ज्ञदेखील प्रवीण असला पाहिजे. कारण शेवटी 'योजककस्तत्र दुर्लभः ।'

म्हणूनच रत्नाध्याय करण्याकरिता पारंगत व ज्ञानी वास्तुतज्ज्ञाची योजना करण्याची जबाबदारी मात्र सर्वस्वी तुमचीच आहे.

**बबनराव पाटील**
१, वैष्णवनिवास, आकुर्ली क्रॉस रोड नं. २,
कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१.
भ्रमणध्वनी : ९८२१३१८५५२